Chapter-6



# प्रकरण ६ वें

## आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचें सार

आपण आत्मचरित्र कां वाचतो या विषयीं पहिल्या प्रकरणांत केलेली चर्चा वाचकांना स्मरत असेलच. तीवरून आपल्या ध्यानांत आलें असेल कीं आपल्याही जीवनाचें सार्थक व्हावें असें आपणास वाटतें. वास्तव आपल्याला ज्या अडचणी येत आहेत त्या आत्मचरित्रकारांनाही आल्या कीं काय हें पाहायला आपण फार उत्सुक असतो. कारण त्यांनाही तशाच अडचणी आल्या असतील तर मग त्यांनी त्या अडचणींतून मार्ग कसा काढला हें जाणायला आपण फार आतुर असतो.

परंतु या साठीं सर्वच आत्मचरित्रें वाचायचीं म्हटलीं तर फार कठीण काम. म्हणजे हें कार्य अशक्य कोटीचें आहे असें मात्र म्हणणें नाहीं. परंतु सामान्य मनुष्याच्या दृष्टीनें हें फार अवघड काम आहे यांत शंका नाहीं. म्हणून ज्या आत्मचरित्रकारांनी 'मी माझी उन्नति कशी करून घेतली' किंवा 'कोणत्या गोष्टींमुळें मला आयुष्यांत यश मिळालें?' या विषयीं जें सांगितलें आहे तें येथे दिलें आहे.

परंतु पुष्कळ आत्मचरित्रकारांनी असें स्पष्ट सांगितलेलें नाहीं. तरीही त्या आत्मचरित्रकाराचें सर्व आयुष्य आणि त्या आत्मचरित्रकाराने केलेली कर्तबगारी

आपल्या लक्षांत येऊन त्यावरून कोणता बोध घ्यावयाचा तो आपण घेऊ शकतो. तसें पाहण्याचा आपला दृष्टीकोन मात्र असला पाहिजे. दुसऱ्याने दिलेली शिदोरी आपल्याला आयुष्यभर उपयोगी पडत नाही असें म्हणतात. परंतु त्या शिदोरीचा थोडातरी उपयोग होऊ शकतो हेंहि कोणाला नाकारता येणार नाही. या आत्मचरित्रकारांच्या अनुभवाचें सार पाहून सर्वांनाच त्याचा फायदा होईल असें म्हणणें नाही. परंतु कोणालातरी थोडा फार उपयोग होईल असें वाटल्या वरून हें मुद्दाम देत आहे.

१ — आपण अधिक सोशिक बनलें पाहिजे

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे म्हणतात की आपण अधिक सोशिक बनलें पाहिजे.

(१) " ताईसासूबाई रागाने बोलत असतांना स्वतः काहीच उत्तर दिलें नाही. ह्यामुळे ताईसासूबाईचा झालेला समज कायम राहून तो आजच्याहून उद्या जास्त जाचक होईल हें मला माहीत होतें. म्हणून अधिक भीती वाटली. " तिने आपणहून वाचलें नाही. मी सांगितलें म्हणून वाचलें, " इतकें जरी स्वतः म्हटलें असतें तरी मला पुरें होतें. पण तसें काही झालें नाही.

जेवण झाल्यावर रोजच्या सारखे उठून माडीवर जाणे झाले. मीही बऱ्याच वेळाने वर गेलें. तेव्हा हसून म्हटलें "का ? आजचा सपाटा कसा काय आहे ? हल्ला तर फार जोराचा आहे बुवा. तो फार दिवस त्रास देईलसें वाटतें. पण आपणाला तितकीच उलट तयारी केली पाहिजे. आपण तितक्याच

(१) ' आमच्या आयुष्यांतील आठवणी ' - रमाबाई रानडे पृष्ठ ९०.९१

सोशिकपणाने व धिम्मेपणाने हें सर्व सहन केलें पाहिजे, असा आपण निश्चय करं. त्यांचा राग वाढण्याला आपणाकडून जागाच द्यावयाची नाही. त्यांच्या वेळच्या समजुतीप्रमाणें त्या बोलतात, त्यांत त्यांचा दोष नाही. पण त्यांना दुखवावयाचें नाही, उत्तर द्यावयाचें नाही एवढें तू कर. त्यांचें वाटेल तसें बोलणें मुकाट्याने ऐकून घेणे जरा त्रासाचें आहे हें मी समजतों पण आज होणाऱ्या त्रासापासून जो सोशिकपणा आपण शिकू तो आपल्याला जन्मभर उपयोगी पडेल. एकदा ही सवय लागली म्हणजे आपल्या विरुध्द कोणी कितीही बोलत असलें तरी या सवयीने मनाची उचंबळ होत नाही व त्रास होत नाही. तेव्हा काही न बोलता खरें व योग्य दिसेल तें मात्र करावयाचें, सोडावयाचें नाही हें पक्के लक्षांत ठेव. ताईचा व अक्काचा स्वभाव कडक आहे. त्याला उपाय नाही. अशा माणसांना उत्तर न देणें बरें. मी सुध्दा त्यांचें बोलणें ऐकून घेतों हें तू पहात नाहीस का ? आता माझ्यापेक्षा तुला अधिक त्रास होतो हें खरें आहे, पण ही इतर मंडळी कितीही बोलली तरी मी तुला आहे ना ? मग इतकें भिण्याचे कारण काय आहे बरें ! थोडें धीराने वागण्यास शिकावें. तरीही वाईट वाटेल पण तें थोड्या दिवसांचें आहे, तें काही नेहमी राहणार नाही." वगैरे वगैरे पुष्कळ तऱ्हेने माझी समजूत घातली."

२ जसा प्रसंग येईल तसे दिवस काढणें चांगले

आनंदीबाई कर्वे म्हणतात की जसे दिवस येतील तसें काढणें हें चांगले.

(१) एकंदरींत जगांत हेकटपणाने वागण्यापेक्षा जसा प्रसंग येईल तसे

(१) 'माझें पुराण' - आनंदीबाई कर्वे - पृष्ठ १२९

दिवस काढणें चांगलें. मी देखील जगांत जसे आले तसे दिवस काढले. सर्वच दिवस चांगले होते असें नाही. बरे वाईट जसे आले तसे दिवस आतापर्यंत निघाले. आता पर्यंत माझ्या आयुष्यांत सुख व आनंद आहे. आता एकाच गोष्टीची इच्छा आहे की कर्वे जीवंत असतांना अहेवपणातच मला मरण यावें आणि तें सुध्दा माझ्या आईसारखें. माझ्या आईने मरणाच्या दिवशी सकाळी तात्यांना (माझ्या भावाला) गरम भाकरी करून घातली. नंतर सर्वांना सांगून त्याच दिवशी गेली.

थकलेली दिसल्याने तात्यांनी विचारलें " मी आज कोर्टांत जाऊं नको का ? " पण ती म्हणाली " काही नको माझें ठीक आहे. " दुपारी वामकुक्षीला देवापुढे निजली ती उठलीच नाही. जागी झाल्यावर जरा घालमेल झाल्यासारखें वाटलें, तेव्हा बाबा शेजारी आले व ती गेली.

लोकांवर आपला कोणत्याही तऱ्हेचा भार पडू नये अशा तऱ्हेनेच आम्ही वागत आलों आहोत आणि शेवटच्या क्षणापर्यंत कोणावरही भार न टाकता इहलोकचीयात्रा संपवावी अशी मनापासूनची इच्छा आहे. मागून लोकांना थोडासा त्रास पडणारच पण त्याला काही इलाज नाही. "

## ३ मनाचें बक्षीस हेंच खरें बक्षीस

साहित्य सम्राट नरसिंह चिंतामण केळकर म्हणतात की आपल्या मनाचें बक्षीस हेंच खरें प्रशस्तीपत्र होय....

(१) " स्वार्थत्याग ही बाबच अशी आहे की ज्याला स्वार्थत्याग करावयाचा असेल त्याने स्वयंस्फूर्तीने व आपल्या जबाबदारीवर करावा. अशा

---

(१) ' गत गोष्टी ' ... न. चिं. केळकर ... पृष्ट ८६४

बाबतीत कोणी कोणाचा सल्ला घेऊ नये. ज्याला स्वार्थत्याग करावयाचा त्याने तो स्वताच्या हिंमतीवर करावा; परिणामाचे धनी आपण या बुध्दीने करावा. स्वार्थत्याग हा ज्याचा त्याने करावयाचा असतो. जें करावयाचें तें ज्याचें त्याने आपल्या जबाब्दारीवर आजूबाजूस न पाहता, पुढील परिणामाबद्दल कुरकुर न करता आणि तें सुध्दा स्वतःला वाटलें म्हणून करावें. लोकांनी सांगितलें म्हणून स्वार्थत्याग करूं नये. अशारितीने स्वार्थत्याग करणाराला एकांतात असतांना स्वतःच्या समाधानाचे तरी सुख मिळेल. स्वतःच्या मनाचें बक्षीस हेंच खरें बक्षीस होय."

## ४ विव्दत्तेपेक्षा सुस्वभावाला अधिक किंमत

तात्यासाहेब केळकर म्हणतात की सुस्वभाव हा विव्दत्तेपेक्षा अधिक मोलाचा असतो.

(पृष्ट २०३) "असो हें मध्येच आलेलें उपाख्यान लांबलें. पण तो विषयही संपला. जिनसीवाल्यांच्या विषयी माझ्या मनात फार आदर असे. पण विव्दत्तेपेक्षा सुस्वभावाला मी अधिक किंमत देतो. यामुळेच कै. विसूभाऊ राजवाड्यावरही माझा मनांतून राग असे. विव्दानाने उद्दाम व अन्यायी व्हावे व इतरावर जुलुम करावा इतरांना तुच्छतेने वागवावे हें त्याच्या विव्दत्तेला मी लांछन समजतो."

## ५ माझा माझ्यावर जास्त विश्वास आहे

संत वाड्.मयाचे उपासक लक्ष्मण रामचंद्र पांगारकर म्हणतात की माझा माझ्यावर जास्त विश्वास आहे.

(१) " आमचे एक मित्र एम.डी.मित्र यांनी मला गोपाळराव देशमुख याजकडे नेले. त्यांनी सांगितलें की 'ताबडतोब जीभ कापली पाहिजे.' आमचे मित्रास मी म्हटलें ' ह्या अघोर उपायाशिवाय दुसरा काही उपायच नाही का ?' त्यांनी उत्तर दिलें Operation on death, No alternative. [ ऑपरेशन करून जीभ कापून टाका नाहीतर मरा. तिसरा प्रकार नाही! ]

या वेळी माझें आत्मबळ कसें उसळलें कोण जाणें ! मी तितक्याच त्वेषाने म्हटलें ' सगळ्या डॉक्टरांना समुद्रात नेऊन बुडवा ! मी ऑपरेशनही करून घेत नाही आणि मरतही नाही. मला आणखी महत्त्वाचीं कामें करायचीं आहेत.' डॉक्टर मऊ होऊन म्हणाले ' तुमचा माझ्यावर विश्वास नाही काय ?' मी उत्तर केलें ' माझा माझ्यावर जितका विश्वास आहे तितका जगातल्या सगळ्या डॉक्टरावर नाही."

६ — खातें खाऊन टाकतें

पांगारकर पुढे म्हणतात की ज्याला उन्नति करून घ्यायची आहे त्याने कोठेही उधारी करूं नये म्हणून ....

पृष्ट १६ वर ते म्हणतात "हिशेबीपणा हा व्यवहाराचा प्राण आहे व कालक्रम हा इतिहासाचा डोळा आहे. Chronology is the eye of history and account keeping is the life of business असें मी कोठेंसें वाचलें होतें. व्यवहाराच्या दक्षतेमुळे परमार्थ चिंतन निर्वेधपणें होतें, स्मरणशक्तीला फारसा ताण असत नाही. देण्या घेण्यात बाधा रहात नाही. कोठे ही खातें ठेऊं नये व रोखीशिवाय व्यवहार करूं नये. याबद्दल

---

(१) ' चरित्रचन्द्र ' - ल.रा.पांगारकर - पृष्ट ४६१

मला एकदा अद्दल घडवून आमच्या राष्ट्रीय पक्षातल्या एका दुकानदाराने पुण्यास शिकविलें. तेव्हापासून माझें कोठें खातें नाही, कारण खातें खाऊन टाकतें."

७

खऱ्या प्रेमाच्या आड कोणतेच भेद येत नाहीत

कृत्रिम भेद हे खऱ्या प्रेमाच्या आड येत नाहीत या विषयी पृष्ठ ४०६ वर पांगारकर म्हणतात ....

"आमचे रामभाऊ दांडेकर किंवा गुलाबराव महाराज हे मला लाखो जाती ब्राह्मणापेक्षा अधिक वंदनीय वाटतात. गुण हेंच खरें पूजास्थान होय. तेथे जाती, वय, लिंग, धन लौकिक हे खालचे विकार उत्पन्नच होत नाहीत. जाती मुद्दाम मोडू म्हटल्या तर जात नाहीत, व ठेवू म्हटल्याने रहात नाहीत. शुद्ध प्रेमांत सारे कृत्रिम भेद लयाला जातात. रामकृष्ण परमहंस यांनी म्हटलें आहे "ज्ञान झाल्यावर जातीभेद रहात नाहीत. फोड बरा झाला की खपली अपाप गळून पडते, पण मध्येच मुद्दाम काढू लागल्यास रक्त निघते." जातीभेदाविषयी माझ्या मनांत कर्मठाची तीव्रता नाही, व सक्रांतिकारवाल्यांची उत्कंठाही नाही ! जातीभेद, आहारभेद, स्वभावभेद कोणतेच भेद खऱ्या प्रेमाच्या आड येत नाहीत."

८

जेथल्या तेथे आणि जेव्हाच्या तेव्हा

रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचें म्हणणें असें की काम जेव्हाच्या तेव्हा आणि अगदी व्यवस्थित केलें तर माणसाचा उदय होतो.

(१) " Desire to improve at every moment and in every detail is the strongest urge for life's fulfilment.

हें ब्रीद वाक्य माझ्या टिपणांत वारंवार नोंदून ठेवलेलें मला आढळतें. त्यांतच माझ्या स्वभावाची मुख्य खोच बनली आहे. होस हौ म्हणून कशी तरी वेळ मारून नेण्याची शक्कल मला जन्मांत कधी साधली नाही. काम अगदी लहान व हलकें असो की श्रमाचें व महत्त्वाचें असो तें शक्य तितकें परिपूर्ण किंवा यथास्थित करण्यात मी कधी हलगर्जीपणा दाखविला नाही. तें वेळेवर किंबहुना वेळेच्या आधी आणि आपली सर्व अक्कल खर्चून होईल तितकें चांगलें करून दाखवायचें ही सवयच माझ्या अंगवळणी पडून गेली. कोणी एखादा लेख मागितला किंवा कोणाला एखादा इतिहासातला किंवा अन्य संदर्भ हवा असला, पत्राने किंवा प्रत्यक्ष तशी पृच्छा आली की शक्य तोंवर ती लवकर सिद्दीस नेल्याशिवाय मला चैनच पडायचें नाही. तें काम हातावेगळें होई पर्यंत मनास सारखी टोंचणी लागलेली असायची. बडोद्याच्या नोकरीत महाराजाकडून दररोज असे काही ना काही काम निघायचें, मुलांना शिकवितांना कितीतरी प्रश्न क्षणोक्षणी उपस्थित व्हायचे, पण ते मी कधी अंगावाहेर टाकले नाहीत. आपली शिकस्त करून हरएक कामाची पूर्तता हटकून करायची अशी माझी वृत्ति पहिल्यापासून बनल्यामुळे कोणाचीही बोलणी खाण्याची पाळी मला कधी आली नाही. उलट प्रत्येकाची अशी खात्री असे की यांनी कबूल केलेलें काम बिनदिक्कत होणार, कधी चुकावयाचें नाही. पत्राचा जबाब वेळेवर जायचा, पत्रें बिनजबाबानें पडून राहिली असें कधी व्हायचें नाही. स्वच्छता, नीटनेटकेपणा, व्यवस्था, टापटीप, जेथल्या तेथे जेव्हाच्या तेव्हा इत्यादि सर्व

---

(१) ' माझी संसार यात्रा ' .. गो.स.सरदेसाई .- [illegible]

काही गुण एकाच मुख्य वृत्तीचे पर्याय आहेत. वेळेवर जेवण, वेळेवर झोप, वेळेवर उठणें, जणू काय सर्व व्यवहार घड्याळाच्या नियमित गतीने चालू असायचे, त्यांत व्यत्यय केवळ आजाराच्या किंवा अशाच अपरिहार्य कारणाने आला तरच. हा माझा एकंदर कित्ता जवळच्यांच्या इतका परिचयाचा झाला होता की ज्यांत ज्यांत माझा एकत्र संबंध यायचा, त्या त्या कामांत ते सर्व मला भिऊन वागत. सर्वांनी वेळेवर जेवायला यायचें, कपडालत्ता, पुस्तकें कागद व्यवस्थित जागच्या जागी ठेवायचे, केव्हाही कोणी आला तरी घरांत त्यास अव्यवस्था म्हणून दिसायची नाही. अशी माझी घरची पद्धत पडून गेल्यामुळे आमचे व्यवहार सुलभ व नियमित उलगडत. सर्व कुटुंबालाच असें वळण लागत गेलें. त्यांतून सुदैवाने ह्या प्रवृत्तीचें पोषण सयाजीराव महाराजांच्या तशाच रेखीव व नियमित स्वभावामुळे माझ्या अंगवळणी पडत गेलें. संगतीने अशा सवयी कायमच्या बनतात. "

५

## माणसाचा उदय झालाच पाहिजे

कामाचा मोबदला मिळो अगर न मिळो तें अंतःकरणापासून करायचें असा आपला बाणा पाहिजे.

(१) " पुढे आलेलें काम शक्यतितकी काळजी घेऊन बजावीत गेलें की माणसाचा उदय झालाच पाहिजे, अशी माझी ठाम समजूत आहे. उदयाची संधी सर्वांसच सारखी येईल असें नाही पण बहुधा केव्हा ना केव्हा अशी संधी प्रत्येकास येते. मात्र ती येईल तेव्हां तिचा उपयोग करण्याची अंगची पात्रता त्याने सदैव कमावीत असलें पाहिजे. शिपोशीच्या शाळेंत, रत्नागिरीच्या हायस्कुलांत,

(१) ' माझी संसार यात्रा ' .. गो.स.सरदेसाई.. [illegible]

मुंबईत बापूसाहेब आठल्यांच्या घरीं किंवा पुढे बडोद्याच्या महाराजांच्या सेवेंत मी आपल्या व्यवस्थित वर्तनाने सदैव भलाई मिळवीत गेलो. हा परिणाम माझ्या निरलस वृत्तीचा होय. दुसऱ्यानें वाईट केलें तर त्याचें फळ तो भोगील, मी होऊन त्याची सूड घेण्याची भलतीच बुद्धि मनांत कधीं वाढली नाहीं. दुसऱ्याचें अहित करण्यात आपल्याच यातना नाहक वाढतात हें लक्षांत ठेवून मी वागलों. म्हणूनच मला वाटतें माझ्या सारख्या सामान्य माणसाला कांहीएक विशिष्ट करामत पैदा करता आली. " आत्मैवह्यात्मनो बंधु: आत्मैव रिपुरात्मन: " हें तत्त्व मला पूर्णपणें पटतें. प्रत्येकाचें बुद्धि सामर्थ्य कमी अधिक असेल. तें आपणांस बदलता येणार नाहीं, पण सद्भावना मात्र सर्वस्वी प्रत्येकाच्या हातची आहे. पत्करलेलें काम मनोभावानें पूर्ण करायचें, त्याचा मोबदला मिळो अगर न मिळो, मिळेल तेवढ्यात संतुष्ट राहायचें ही भगवद्गीतेची शिकवण आपण व्यवहारांत पाळली की आपला कार्यभाग संपला. "

## १० आपणच आपला निवाडा करावा

कठिण प्रसंगीं माणसाने स्वत:च न्यायनिवाडा करावा असें सरदेसाईंचे मत आहे......

(१) " व्यवहारांत हरहमेश अनेक प्रसंग इष्ट किंवा अनिष्ट घडून येतात. अशा प्रसंगांनीं मनाचें स्वास्थ्य बिघडून अंत:करणास सारखी खिन्नता उत्पन्न होते. घरातल्या मंडळींशी किंवा स्नेह्यासोबत्यांशी स्पष्टपणें बोलून कित्येक लोक आपलें मन हलकें करीत असतील. माझा मात्र ह्या बाबतींतला क्रम बराच वेगळा होता. एखादा विषय मनास त्रास देऊ

---

(१) 'माझी संसार यात्रा' - .. गो.स.सरदेसाई ..

लागला की मी लगेच बसून त्याचें निदान कागदावर टिपून ठेवीत असे. कागदावर तपशील मांडू लागले म्हणजे गुणावगुण व दोषार्हता स्पष्ट होते. आपली चूक असली तर पदरात घ्यावी, दुसऱ्याची असली तर त्याच्या माथीं मारावी ही सोय लेखाने होते आणि ही न्यायाधिशाची भूमिका स्वीकारून एकदा निवाडा लिहून टाकला की तें प्रकरण संपून मनास पुन: स्थैर्य प्राप्त होतें. नवरा बायकोतील धुसफूस, कुटुंबीयांचे व्यवहार, देवघेवीचे विषय, नोकरचाकरांच्या कलागती असले प्रकार हमेशा घडून आवेशाच्या भरात आपण भलताच शब्द बोलून जातो किंवा भलतेंच आचरण करतों. मागाहून त्याचा पस्तावा येतो. असले कितीतरी विषय त्यावेळीं लिहून ठेवलेले माझ्या टिपणांत आज मला आढळतात. मला वाटतें आपणच आपला निवाडा नि:पक्षपाताने करणें ह्यांतच माणुसकीची उत्कृष्ट भलाई आहे. ह्या लेखनोपायाचा मला अतिशय उपयोग झाला आणि मी सावधपणा धारण करूं शकलों. अद्यापि ती टिपणें मला मार्गदर्शन करतात. विस्तार भयास्तव ती मला येथें देता येत नाहींत. "

११

दुसऱ्याचा आनंद
तोच
आपला आनंद

दुसऱ्याच्या आनंदांत आपला आनंद आहे असें आपण मानलें तर सुख दूर नाही असा विचार माई सरदेसाई यांनी सुचविलेला आहे.

(१) " सतत उद्योगात वेळ काढणे ह्यासारखा आनंद नाही. मी लहानसें कव्हर केलेलें जमलें तर केवढा आनंद होतो, मग ह्यांच्या ह्या इतिहासासारखे उद्योग तडीस

---

(१) ' माझी संसार यात्रा ' .. गो.स.सरदेसाई
यातील लक्ष्मीबाई उर्फ माई सरदेसाई यांनी लिहिलेला भाग

गेले तर तो आनंद काय वर्णावा ! निश्चयाने थोडाथोडा उद्योग केला तरी त्याचें फळ मिळाल्याशिवाय रहात नाही. संसारांत पुष्कळशा गोष्टी आपणास कर्तव्य म्हणूनच कराव्या लागतात. मग त्यांत भलेपण मिळतेंच असें नाही. प्रत्येकाचा स्वभाव व अनुभव भिन्न असल्यामुळे एकाच्या गोष्टी दुसऱ्याला पटतील असें थोडेंच आहे. म्हणून मनुष्यानें निराश असें कधी होऊ नये. आहे त्यात समाधानी वृत्ती ठेवीत जावी. पैशाने सुख होतें असें तर मुळीच नाही. मुलें असलीं तरी तीं सुशिक्षित होऊन त्यांजकडून सुख लाभतेंच असें नाही. संसार सर्व संकटमय आहे. आपल्या वर्तनाने दुसऱ्याला आनंद व संतोष होईल असें वागलें पाहिजे. दुसऱ्याचा आनंद तोच आपला आनंद असें मानून राहणें ह्यात केवढा थोरपणा आहे. "

**१२** — **देशभक्तीचें बीज पेरण्याला ऐतिहासिक स्थलांचें दर्शन**

स्फूर्ति मिळण्यासाठी लहानपणीं मुलांना ऐतिहासिक स्थळांचें दर्शन घडवावें, असें दाजी नागेश आपटे म्हणतात....

(१)" माझ्या आजोळच्या घराण्याची कुलस्वामिनी प्रतापगडची भवानी ही होय. म्हणून आम्ही तेथील सर्व स्थळें पाहिलीं. त्यांतील भवानीचें देऊळ व मूर्ति आणि अफझलखानाचें थडगें हीं माझ्या विशेष स्मरणांत राहिलीं आहेत. त्या प्रसंगी त्या गडाचा सर्व इतिहास माझ्या आईने मला अनेकवार सांगितला. शिवाजी महाराजांचा पराक्रम, त्यांनी स्वराज्य स्थापिल्याची हकीकत, अफझुलखानाची स्वारी व त्याला शिवाजी महाराजांनी ठार मारल्याचा

---

(१) 'आत्मवृत्त ' .. दा.ना.आपटे - पृष्ठ ३२

वृत्तान्त आणि त्याचें मुंडकें देवीसमोर पुरल्याचें वृत्त हें सर्व तिनें मला सांगितलें. मला वाटतें माझ्या अंतःकरणांत शिवाजी महाराजांबद्दलची भक्ति व मराठ्यांच्या इतिहासाबद्दलचें प्रेम यांचें बीज या प्रसंगींच पेरलें गेलें. कारण त्यानंतर शिवाजी महाराज, मराठे, हिंदुधर्म, श्रीरामदास यांची नांवें घेतल्याबरोबर विचारालाही अवसर न देता माझ्या अंतर्मनांतून जो या सर्व नांवाविषयींच्या प्रेमाचा व आदराचा उमाळा बाहेर पडतो त्याचें मूळ कारण ही प्रतापगडची यात्रा होय यांत शंका नाही. मनुष्याच्या हातून पुढे देशभक्तीचें काही कार्य होवो वा न होवो, पण त्याच्या मनांत देशभक्तीचें बीज पेरण्याला ऐतिहासिक स्थळांचें दर्शन अगदी लहानपणीं घडविणें हे एक महत्त्वाचें साधन आहे अशी माझी खात्री झाली आहे."

१३

## हृदयाच्या हाकेला ओ दिल्याचें समाधान

श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर म्हणतात की माणसानें आपल्या हृदयाच्या हाकेला ओ दिली पाहिजे.

(१) " आपला आवडता व्यवसाय करण्यांत जरी अपेश आलें तरी तें पत्करलें. त्या अपेशांत सुद्धा हृदयाच्या हाकेला ओ दिल्याचें, स्वतःच्या बुद्धीनें दाखविलेल्या ध्येयाला अनुसरल्याचें समाधान असतें. त्या समाधानाला जगांत उपमा नाही. स्वतःच्या मनाला तळमळत ठेवून आणि बुद्धीच्या संवेदनांना दाबून टाकून केलेल्या व्यवसायांत यश मिळालें तरी त्यांत सुख नाही, आत्मविकासाचा आनंद नाही. "

---

(१) 'दोन तपें' ... श्री. ग. त्र्यं. माडखोलकर
पृष्ट २५७

१४

## उद्योग नशिबाचा कारागीर

डॉ. ना.भा.खरे म्हणतात की, उद्योगाशिवाय मनुष्याची उन्नति होणें शक्य नाही.

(१) " अल्वर येथे माझी नेमणूक होऊ नये अशी खटपट कोणी तुमचा विरोधी करीत आहे, हें जें मला ज्योतिषी कृष्णमूर्तींनी सांगितलें होतें त्याचा पडताळा मला मी जून महिन्यात दिल्लीस गेलों असतांना आला. दिल्ली येथें कुलकर्णी नांवाचा एक तरुण महाराष्ट्रीय वर्तमानपत्राचा बातमीदार आहे. तो त्या वेळेस हिंदुसभा भवनातच राहात असे. त्याचे माझे संबंधही चांगले होते. कारण मी दिल्ली येथे व्हॉइसरॉयच्या कौन्सिलचा सदस्य असतांना तो माझ्या मुलांचा खाजगी शिक्षक होता. यानेच मला सरदार वल्लभभाई पटेल हे माझ्या अल्वर येथील नेमणुकीच्या विरुध्द खटपट करीत होते अशी बातमी दिली. ती बातमी त्यालाही ग्वाल्हेर येथे लागली. १७,१८ एप्रिल १९४७ या रोजी ग्वाल्हेर येथे व्हॉइसरॉयच्या कौन्सिलचे उपाध्यक्ष पं. नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली अ.भा.संस्थानी प्रजा परिषदेचें अधिवेशन भरलें होते. या अधिवेशनाला हे श्री. कुलकर्णी गेले असतांना साहाजीकच महाराष्ट्रीय कांग्रेसजनांची आणि त्यांची गाठ पडली. त्या वेळेस काही भूदानी आणि अवदानी महाराष्ट्रीय कांग्रेस नेत्यांची आपसात चर्चा चालली होती. ते म्हणत होते की " डॉ.खरे अल्वर येथे दिवाण होणार आहे असें म्हणतात. पण तसें होणार नाही. कारण आमचे सरदार गव्हर्नमेंट ऑफ इंडियांत आहेत ना ?'पण जेव्हा दुसऱ्याच दिवशी

(१) ' माझी बारा वर्षे ' डॉ. ना.भा.खरे पृष्ठ ५०,५१

नी अल्वरच्या मुख्य मंत्रीपदाचा चार्ज घेतल्याचें जाहीर झालें तेव्हा हेच मूदाने अवदाने म्हणाले "अरे ! हा आला बेटा डॉ. खरा अखेरीस अल्वरला प्राइम मिनिस्टर होऊन ! आमच्या सरदारांची खटपट वायाच गेलेली दिसते. आता हा अल्वर संस्थानातर्फे घटना समितीत मोठ्या दिमाखाने येऊन बसेल ! याचें नशीबही मोठें अजब आहे बुवा ! याला कितीही गाडले तरी हा आपला उठून बसतोच !"

हा वरील संवाद श्री. कुलकर्णी यांनी मला सांगितला म्हणूनच श्री कृष्णमूर्तीचें याही बाबतींतलें ज्योतिष खरें झालें असें मला कळलें. नाहीतर कळण्याला काही मार्ग नव्हता. ही ज्योतीष्याच्या भविष्याची हकीकत मी इतकी तपशीलवार दिली आहे त्यावरून मी ज्योतिषाचा भोक्ता आहे अशी समजूत कोणी करून घेऊ नये. ज्योतिषाला विचारून तो सांगेल त्या प्रमाणें आपला जीवनक्रम आखणे हा मूर्खपणा आहे, असें मी मानतो. भविष्य खोटेंही ठरतें. कारण याच ज्योतिषाने मला सांगितलें होतें की ग्वाल्हेरच्या संसदीय पोट निवडणुकीत माझा पराभव होईल. पण त्याचें तें भविष्य चूक ठरलें आणि त्या निवडणुकीत मी यशस्वी होऊन संसदेत गेलो. म्हणून उद्योग नशिबाचा कारागीर आहे हेंच ~~तत्वज्ञान~~ तत्त्वज्ञान बरोबर आहे. "

**१५** — **त्याचा आवाज खणखणलाच पाहिजे**

आपण उद्योगी आणि मेहनती असलों तर आपला आवाज खणखणलाच पाहिजे असें शांता आपटे यांचें म्हणणें आहे.

(१) " आपल्या अंगावर जी जबाबदारी येऊन पडली असेल ती

(१) ' जाऊ मी सिनेमांत ? ' .. शांता आपटे - पृष्ठ ८१.८२

पूर्णपणे पार पाडणें, आपलें कर्तव्य आपण चोख रीतीने करीत राहणें, जें काम आपल्याला करावयाचें आहे त्यांत आपल्याला यश लाभावें म्हणून त्याबद्दलचा कसून अभ्यास करणें, व त्या करिता कितीही श्रम पडले तरी त्याची पर्वा न करणें अशी कार्यनिष्ठा प्रत्येकाची असेल, प्रत्येक नटनटीची असेल तर कसलीही निराशाजनक परिस्थिती असो त्यातून मार्ग निघालाच पाहिजे. त्या मार्गांत कोणालाही अडथळा आणता येणार नाही. प्रगती झालीच पाहिजे. आपण आपल्या कामांत पूर्ण वाकबगार असल्यावर, आपण आपल्या कलेंत पूर्ण प्राविण्य संपादन केलें असल्यावर कोणतीही प्रमत्त वा उन्मत्त भांडवलशाही असो, तिला आपल्यावर जुलुम करता येणें शक्य नाही. तिच्या बेबंदशाही कपटनीतीला आपला बळी घेणे कालत्रयीही शक्य होणार नाही. आपला दाम खरा असला तर त्याचा आवाज खणखणलाच पाहिजे. शिवाय नट हा जन्मावा लागतो, ती एक स्वतंत्र खाण आहे. तो एखाद्या संस्थेकरिता जन्माला येत नाही, तो आपला जन्मताच स्वयंभू तेजानेच चमकतो. या गोष्टी जोवर सत्य आहेत तोंपर्यंत कसल्याही मुर्दाड भांडवलशाहीला अशा कलावंताला शरण आलेंच पाहिजे. नटाला परमेश्वरी कृपेने लाभलेला गोड व मधुर आवाज म्हणजे काही सतारीची तार नव्हे की खुंटी आवळताच तिची तार सुरात येईल. सुरेल आवाज व अभिजात अभिनय या नटाला लाभलेल्या देणग्या आहेत. त्या मिळालेल्या असोत की मिळविलेल्या असोत त्यांची जागा कोणीही भरून निघणार नाही यंत्राने तर नाहीच नाही."

**१६** — **ॐ भक्ती या पक्षा लाथाडिले पाहिजे**

उद्योगरत्न श्री. वि.रा.वेलणकर म्हणतात की आपण भिक्षा मागायचें सोडून उद्योगाने लक्षाधीश होण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

(१) " आपसांतील कलह सोडून मधुर भाषण शिकून नम्र होऊन लक्षाधीश होऊ म्हटलें तर ती गोष्ट अवघड खास नाही. दे.भ.कै.भा.भ.भोपटकर आपल्या "भाऊवोधा" मध्ये महाराष्ट्रीयास उद्देशून म्हणतात ....

"मराठ्यांची मूळ दीक्षा। मेळविलें पाहिजे दोन लक्षा।
ॐ भवती ~~भक्ती~~ या पक्षा । लाथाडिले पाहिजे ॥"

| १७ | खाली गेलेल्या जीवांना वरती आणा |
|---|---|

पुढे पृष्ट ६२३ वर उद्योगरत्न श्री. वि.रा.वेलणकर म्हणतात "आता स्वराज्य मिळालें आहे. त्याचें सुराज्य होण्यासाठीं श्रीमंतांनी संपत्ती, विव्दानांनी विद्या, व वृद्धांनी समाजसेवा करून खाली गेलेले अनेक जीव म्हणजे समाजातील अनेक व्यक्ती वर येतील असा प्रयत्न केला पाहिजे.

तपश्चर्या करीत बसण्याचें युग, यज्ञयाग करून अग्नींत आहुती देण्याचें युग, सेन्यास घेण्याचें युग, जसें गेलें तसेंच मूर्तिपूजा करून, वाचाकरून, जप करून, प्रदक्षिणा घालून जन्माचें सार्थक मानण्याचें युग गेलें आहे. आता समाज सुधारण्याचें व भूतदयेचें युग आलें आहे. जगांतील सुधारलेलीं सर्व राष्ट्रें समाजसेवेमुळेच मोठीं झालीं आहेत. इतकी प्रचंड महती समाजसेवेची, म्हणजे चालत्या बोलत्या मूर्तीची पूजा करण्यामध्ये आहे. तेव्हा आपण चालत्या बोलत्या मूर्तीची म्हणजे समाजाची पूजा यापुढे सर्वांनीच करावी. 'उत्क्रांति करणें हा हेतु जगत रचण्यामध्ये ईश्वराचा आहे हें जाणावें व ईश्वराच्या हेतूला सहाय करणें हीच ईश्वरपूजा व जन्माचें सार्थक आहे."

---

(१) 'मी कारखानदार कसा झालो ?'

श्री. वि.रा.वेलणकर पृष्ट ६१३

१८

## संकल्पाचें सामर्थ्य

संकल्पाचें सामर्थ्य उद्योगरत्न श्री. वेलणकर पुढील प्रमाणें सांगतात...

(१) "सूर्य नमस्काराचे आधी आपण, हे देवा तुला मी १०८ किंवा १४४ किंवा जी संख्या असेल तितके नमस्कार घालीन असें वचन देतो. म्हणजे संकल्प करतो. कोणताही व्यायाम आपण करावयास प्रारंभ केला व त्यातील काही व्यायाम झाला की मन "दुसरा व्यायाम करून कोणीकडून घामच काढावयाचा" असे सांगून करावयास घेतलेल्या व्यायामापासून मनुष्याला परावृत्त करते. अशा वेळीं आपण संकल्प केलेला असला की मग दुसरें मन सांगतें "अरे आताच आपण वचन दिलें व अमुक नमस्कार घालावयाचे कबूल केले आणि तें न पाळणें म्हणजे नामुष्की आहे. तेव्हा तसें करता कामा नये." असे विचार संकल्पामुळे येतात व त्यामुळे मनुष्य निश्चयी बनतो व वचनाप्रमाणें मग नमस्कार पुरे करतो. सूर्य नमस्काराचे व्यायामामध्ये संकल्प किंवा वचन ही फार महत्त्वाची बाब आहे. ही सर्व व्यायाम रक्षण करणारी पेंडीला दोरी बांधतो तसली दोरी होय."

१९

## कर्तव्य हें श्रेष्ठ आणि पवित्र

नाना साहेब केदार यांनी आपली उन्नति उद्योगामुळे करून घेतली असें रमाबाई केदार सांगतात ....

(२) "ह्यांच्या यशाचें रहस्य कशांत आहे, असा जर कोणी प्रश्न

(२) ' वेचलेले मणी ' ... रमाबाई केदार .. पृष्ठ ९४

① मी कारखानदार कसा झालों? श्री वि. रा. वेलणकर पृष्ठ ४६९

केला तर त्यांना मी सांगेन की सचोटी आणि दानत हे मानवी चारित्र्याचे दोन मूलभूत घटक ह्यांच्या ठायी प्रकर्षाने आढळून येत. या गुणांनीच यांना थोर केले. या गुणांनीच यांना कीर्तिशिखरावर आरूढ केले. कोणतीही केस असो, एकदा हाती घेतली की तिच्या सफलतेसाठी चिकाटीने तिच्यामागे लागायचे अशी ह्यांची रीत असे. निव्वळ पैशावर नजर ठेवून केस चालविणे ही गोष्ट ह्यांच्या दानतीला कधीच पटली नाही.

वकिलीच्या धंद्यात पैसा आणि कीर्ति ह्यांच्या पाठीसच लागली म्हणाना! पण पैसा मिळवून चैन करणे एवढीच मनुष्याच्या जीवनाची इतिकर्तव्यता आहे असे ह्यांनी कधीही मानले नाही. या पेक्षाही अधिक काही निराळे श्रेष्ठ व पवित्र कर्तव्य पार पाडण्याची जबाब्दारी मनुष्य मात्रावर आहे, अशी ह्यांची मनोभूमिका होती. आपल्याला काही परोपकारी कर्तृत्व करावयाचे आहे या भावनेनेच हे वकिलीच्या प्रांगणात उतरले होते."

२०

मी माझ्या भूमिकेचा
~~कधीच~~ गळा कापला नाही
कधीच

'बहुरूपी' चे लेखक चिंतामण गणेश कोल्हटकर म्हणतात की ~~मी~~ मी माझी नाटकांतील भूमिका फार मनापासून करीत असे.

(१) " हलवायाच्या चौकांतील पाचसात खणांची एक माडी प्रयोगासाठी पसंत केली. दोन खणांत स्टेज व पाच खण प्रेक्षकासाठी. पडदे तांबड्या आलवणांचे केले. शिवाजीचे वगैरे जे कपडे लागावयाचे त्यांची याचना तेथे प्रयोग करीत असणाऱ्या एका मंडळीकडेच केली. सर्व जुळवाजुळव होऊन

(१) 'बहुरूपी' .. चिं.ग.कोल्हटकर .. पृष्ठ ४९.५०

प्रयोगाचा दिवस ठरला. नाटक मंडळीच्या रंगपटमास्तरशी स्नेह करून त्याच्या वरच आम्हाला रंगविण्याची व दाढीमिशा लावण्याची जोखीम टाकली होती. १९०७ सालची ही गोष्ट. पन्नास वर्षे झाली. त्या रंगपट मास्तरांनी जो रंग लावला तो अद्याप फिका पडला नाही, उतरला नाही. एकेका माणसाचा असा हातगुण असतो. पुढील आयुष्यात त्या माणसाच्या गाठीभेटीचा योग आला असता तर विशेष आनंद वाटला असता. त्या वेळचा रंग म्हणजे सफेता, पिवडी, हिंगुळ या पेक्षा विशेष साहित्य लागत नसे. दाढीमिशा मात्र कशाच्या लावीत तें आता मला स्मरत नाही. त्या दिवशींच्या त्या कृत्रिम दाढी मिशांतील एका केसानेही मी माझ्या भूमिकेचा कधीच गळा कापला नाही. किंवा कुठलीही भूमिका करण्यात केसभरसुद्धा कसर केली नाही. आमचा प्रेक्षक तुफान गर्दीचा म्हणजे संख्येनेच मोजावयाचें झाल्यास मुलाबाळासह हा आकडा पन्नासाच्याही आसपास असावा. ती माडी तर भरलीच होती पण खिडक्यांतून दरवाज्यांतून खाली रस्त्यावर सुद्धा माणसेच माणसे दिसत होती. ही सर्व गर्दी आम्हा भूमिका करणाऱ्या प्रत्येकाच्या घरची व मित्रपरिवारापैकीच होती. "

*** *** ***